<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२०/२०१८ मध्ये निशाणी क्र. ४७ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी, दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, त्यांनी सदरचा दावा, वाटप होवून पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये, दावा कलम १ मध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये मौजे 'माळेवाडी' ऐवजी 'मरवडे' असे चुकीचे नमूद केले गेले आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, सदर दुरुस्ती न झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे, याउलट प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही. करीता, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल न केल्यामुळे, अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे.

४. वादीचा अर्ज व दावा यांचे अवलोकन केले. सदर दावा हा वाटप होऊन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा कलम १ मध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये मौजे 'माळेवाडी' ऐवजी 'मरवडे' असे चुकीचे नमूद केले गेले आहे. दाव्यातील मिळकतीचे वर्णन पाहता, त्यामध्ये मौजे 'मरवडे' असे नमूद केल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी मागणी करतात, त्याप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे दिसून येते. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे, वादी सदर

दुरुस्तीस परवानगी देणे जरुरीचे ठरते. जरी प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास, प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही, याशिवाय दाव्याच्या स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही व उभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल. अशा परिस्थितीत, दावा गुणदोषावर निकाली करण्याकरीता, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित्त होईल. सबब, खालील आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत, प्रस्तुत अर्जात मागितल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन, दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PATIL VRUSHALI KISANRAO

Digitally signed by PATIL VRUSHALI KISANRAO
Date: 2026.04.04 11:48:54 +0530

(व्ही.के. पाटील)

दिनांक : ०२/०४/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : S.M. Gaddam |
| (b) | Court | : Civil Judge Jr. Div., Mangalwedha. |
| (c) | Date of Order | : 02/04/2026 |
| (d) | Order uploaded on | : 04/04/2026 |